इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन)अधिनियम, १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ च्या अंमलबजावणीसाठी सूचना

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ व अनुषंगिक इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम, १९९८ अंतर्गत उपकर वसुलीबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
*शासन परिपत्रक क्र.बीसीए १२००७/प्र.क्र.७८८/कामगार ७.*
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ एप्रिल, २००८.

**शासन परिपत्रक :**

इमारत व इतर बांधकाम कामगार यांचे संदर्भात रोजगार व सेवाशर्ती तसेच त्यांची सुरक्षा, आरोग्य, कल्याण विषयक व इतर संबंधित बाबींसाठी तरतूदी करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ या केंद्रीय कायद्याच्या कलम १८ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना क्र.बीसीए १२००७/प्र.क्र.७७८/कामगार ७, दि.४ ऑगस्ट, २००७ अन्वये महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाची स्थापना केलेली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ च्या तरतुदीनुसार शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.बीसीए २००८/प्र.क्र.९०७/कामगार ७, दि.१६ एप्रिल, २००८ अन्वये उपकर वसुलीसाठी उपकर वसुली अधिकारी, निर्धारण अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम ३(१) अनुसार केंद्र शासनास उपकराची टक्केवारी ठरविणेबाबतच्या असलेल्या अधिकारान्वये केंद्र शासनाच्या कामगार मंत्रालयाने अधिसूचना क्र.एसओ २८९९, दि.२६ सप्टेंबर, १९९६ अन्वये १ % दराने कर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत.

बांधकाम व इतर कामगारांच्या कल्याणांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याकरिता महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळास निधी उपलब्ध होण्यासाठी केंद्र शासनाच्या उपरोक्त अधिसूचनेअन्वये १% उपकर बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार (जमिनीचे मुल्य वगळून) दि.१ जानेवारी २००८ पासून पुर्वलक्षी प्रभावाने राज्यातील इमारत व इतर बांधकाम नियोक्त्यांचेकडून संबंधित

"उपकर वसुली अधिकारी यांनी वसूल करण्यांबाबतची कार्यवाही करावी. या संदर्भात इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर नियम, १९९८ अंतर्गत नियम ४, ५ व ६ खालीलप्रमाणे आहे :-

4. **Time and manner of collection :-**

(1) The cess levied under sub-section (1) of Section 3 of the Act shall be paid by an employer, within thirty days of completion of the construction project or within thirty days of the date on which assessment of cess payable is finalized, whichever is earlier, to the cess collector.

(2) Notwithstanding the provisions of sub-rule (1), where the duration of the project or construction work exceeds one year, cess shall be paid within thirty days of completion of one year from the date of commencement of work and every year thereafter at the notified rates on the cost of construction incurred during the relevant period.

(3) Notwithstanding the provisions of sub-rule (1) and sub-rule (2), where the levy of cess pertains to building and other construction work of a Government or of a Public Sector Undertaking, such Government or the Public Sector Undertaking shall deduct or cause to be deducted the cess payable at the notified rates from the bills paid for such works.

(4) Notwithstanding the provisions of sub-rule (1) and sub-rule (2), where the approval of a construction work by a local authority is required, every application for such approval shall be accompanied by a crossed demand draft in favour of the Board and payable at the station at which the Board is located for an amount of cess payable at the notified rates on the estimated cost of construction.
Provided that if the duration of the project is likely to exceed one year, the demand draft may be for the amount of cess payable on cost of construction estimated to be incurred during one year from the date of commencement and further payments of cess due shall be made as per the provisions of sub-rule (2).

(5) An employer may pay in advance an amount of cess calculated on the basis of the estimated cost of construction along with the notice of commencement of work under Section 46 of the Main Act by a crossed demand draft in favour of the Board and payable at the station at which the Board is located.
Provided that if the duration of the project is likely to exceed one year, the demand draft may be for the amount of cess payable on the cost of construction estimated to be incurred during one year from the date of such commencement and further payment of cess due shall be made as per the provisions of such rule (2).

(6) Advance cess paid under sub-rules (3), (4) and (5), shall be adjusted in the final assessment made by the Assessing Officer

5. **Transfer of the proceeds of the cess to the Board :-**

(1) The proceeds of the cess collected under rule 4 shall be transferred by such Government office, Public Sector Undertakings, local authority, or cess-collector, to the Board along with the form of challan prescribed [and in the head of account of the Board] under the accounting procedures of the State, by whatever name they are known.

(2) Such government office of Public Sector Undertaking may deduct from the cess collected, or claim from the Board, as the case may be, actual collection expenses not exceeding one per cent of the total amount collected.

(3) The amount collected shall be transferred to the Board within thirty days of its collection.

6. **Information to be furnished by the employer :-**

(1) Every employer, within thirty days of commencement of his work of payment of cess, as the case may be, furnish to the Assessing Officer, information in Form I

(2) Any change or modification in the information furnished under sub-rule (1) shall be communicated to the Assessing Officer immediately but not later than thirty days from the date of affecting the modification or change.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( मनोहर बोरकर )
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
७. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
(मंत्रालयीन सर्व विभागांकडून हे परिपत्रक त्यांच्या अधिनरत सर्व सार्वजनिक उपक्रमांच्या निदर्शनास आणण्यात यावे.)
८. मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग
९. मुख्य अभियंता जलसंपदा विभाग
१०.सर्व विभागीय आयुक्त
११.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य , मुंबई
१२.सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद
१३.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१४.सर्व महानगरपालिका आयुक्त
१५.सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती
१६.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद
१७.निवडनस्ती (कामगार-०७)

-----